Series : HF1EG

SET – 4

रोल नं.

Roll No.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| प्रश्न-पत्र कोड Q. P. Code | 8 |
|---|---|

परीक्षार्थी प्रश्न-पत्र कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।

Candidates must write the Q.P. Code on the title page of the answer-book.

# मराठी

# MARATHI

*वेळ : **3** तास*
*निर्धारित समय : **3** घंटे*
*Time allowed : **3** hours*

*गुण : **80***
*अधिकतम अंक : **80***
*Maximum Marks : **80***

- प्रश्नपत्रिकेत **11** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्नपत्रिकेत 8 प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- प्रश्नपत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावर लिहा.
- *उत्तरे लिहिताना प्रश्न क्रमांक दिलेल स्थानवर अवश्य लिहा.*
- प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्नपत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्नपत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करू नये.

- Please check that this question paper contains **11** printed pages.
- Please check that this question paper contains **8** questions.
- Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- **Please write down the Serial Number of the question in the answer-book at the given place before attempting it.**
- 15 minutes time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the candidates will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

~

**General Instructions :**

*(i)* *Question paper is divided into* ***Four*** *sections.*
*(ii)* *It has total 8 questions.*
*(iii)* ***Section A : 2 Questions No. 1 & 2***
*(iv)* ***Section B : 2 Questions No. 3 & 4***
*(v)* ***Section C : 3 Questions No. 5, 6 & 7***
*(vi)* ***Section D : 1 Question No. 8***
*(vii)* *Attempt questions as per specific instructions.*
*(viii)* *Write questions no. in answer book before attempting it.*

***सर्वसाधारण सूचना :***

*(i)* *ही प्रश्नपत्रिका 4 विभागात विभागलेली आहे.*
*(ii)* *प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण 8 प्रश्न आहेत.*
*(iii)* *विभाग A / **अ मध्ये** 2 प्रश्न आहेत. प्रश्न क्र. 1 ते 2*
*(iv)* *विभाग B / **ब मध्ये** 2 प्रश्न आहेत. प्रश्न क्र. 3 ते 4*
*(v)* *विभाग C / **क मध्ये** 3 प्रश्न आहेत. प्रश्न क्र. 5 ते 7*
*(vi)* *विभाग D / **ङ मध्ये** 1 प्रश्न आहेत. प्रश्न क्र. 8*
*(vii)* *दिलेल्या निर्देशानुसार प्रश्नांची उत्तरे लिहा.*
*(viii)* *उत्तर लिहिण्यापूर्वी उत्तरपुस्तिकेत प्रश्न क्रमांक लिहा.*

## विभाग – 'अ' : वाचन व आकलन (15 गुण)

## Section – 'A' : Reading and Comprehension (15 Marks)

1. **खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

वृक्ष जे त्यागाच्या भावनेने स्वतः उन्हात उभे राहतात, पण इतरांना सावली देतात; ज्यांची फळे-फुलेही दुसऱ्यांसाठीच असतात, असे त्यागमय जीवन जगणारे वृक्ष एखाद्या सत्पुरुषासारखेच भासतात. सामान्य माणूसही नेहमीच्या दगदगीपासून दूर जाण्यासाठी, हवापालटासाठी थंड हवेच्या ठिकाणी, निसर्गाच्या सान्निध्यातच जातो. अशा या उपकारकर्त्या वृक्षांचा आज ऱ्हास होताना दिसत आहे. मानवाने बेसुमार जंगलतोड करून वैराण वाळवंटे निर्माण केली आहेत. 'मानवाचे पाऊल नि वाळवंटाची चाहूल' अशी म्हण आहे, ती अगदीच त्याने सार्थ केली आहे. जळणासाठी आणि घरे बांधण्यासाठी बेसुमार वृक्षतोड केली. त्यामुळे उष्णता वाढली. पावसाचे प्रमाण कमी झाले; दुष्काळाचे प्रमाण वाढले; जमिनीची धूप होऊन ती नापीक झाली. परिणामी हवेच्या प्रदूषणासारख्या समस्यांना मानवाला तोंड द्यावे लागले. जंगलात माणूस जितकी कमीत कमी लुडबूड करेल तितके आपले चक्र दुरुस्त करण्याची निसर्गाला संधी मिळेल. जंगलतोड तर थांबली पहिजेच; पण त्याचबरोबर नवीन झाडेही लावली गेली पाहिजेत, जंगले वाढवली पाहिजेत. या सर्व गोष्टींचा विचार करून पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि सर्व लोकांना जंगलाचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी प्रयत्न करणे फार महत्त्वाचे आहे.

(a) दिलेला गद्य उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा. (कोणतेही 3) $3 \times 1 = 3$

(i) वृक्षांची फळे-फुले कोणासाठी असतात ?

(A) इतरांसाठी (B) दुसऱ्यांसाठी

(C) स्वतःसाठी (D) प्राण्यांसाठी

(ii) मानवाने जंगलतोड करून काय निर्माण केले ?

(A) हवेचे प्रदूषण (B) कमी पाऊस

(C) वैराण वाळवंटे (D) नापीक जमीन

(iii) वृक्ष त्यागाच्या भावनेने कोठे उभे राहतात ?

(A) उन्हात (B) पावसात

(C) वाऱ्यात (D) सावलीत

(iv) पावसाचे प्रमाण कमी होण्यामागील मुख्य कारण कोणते ?

(A) वाढती उष्णता (B) नापीक जमीन

(C) वाढता दुष्काळ (D) बेसुमार जंगलतोड

(b) दिलेल्या गद्य उताऱ्याच्या आधारे पुढील प्रश्नांची **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 3) $3 \times 1 = 3$

(i) निसर्गाला चक्र दुरुस्त करण्याची संधी केव्हा मिळेल ?

(ii) त्यागमय जीवन जगणाऱ्या वृक्षाला लेखकाने कोणती उपमा दिली आहे ?

(iii) बेसुमार वृक्षतोडीमागील कोणती कारणे वरील उताऱ्यात आली आहेत ?

(iv) गद्य उताऱ्यानुसार कोणत्या गोष्टींसाठी मानवाने प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे ?

(c) दिलेल्या गद्य उताऱ्याच्या आधारे पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 1) $1 \times 2 = 2$

(i) 'वृक्ष हा उपकारकर्ता', कसा ते सांगा.

(ii) बेसुमार वृक्षतोडीमुळे मानवाला कोणकोणते दुष्परिणाम भोगावे लागत आहेत, स्पष्ट करा.

2. **खालील दिलेली कविता काळजीपूर्वक वाचा व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

ओळखलंत का सर मला, पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी
क्षणभर बसला, नंतर हसला, बोलला वरती पाहून
गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यांत राहून
माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतीत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी, बायको मात्र वाचली
भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते गेले
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले
कारभारणीला घेऊन संगे सर आता लढतो आहे
चिखलगाळ काढतो आहे, पडकी भिंत बांधतो आहे
खिशाकडे हात जाताच, हसत हसत उठला
पैसे नकोत सर जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा

*– कवी कुसुमाग्रज*

(a) दिलेली कविता वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायांमधून निवडा. (कोणतेही **3**) **3 × 1 = 3**

(i) पूरग्रस्त तरुणाचा काय मोडून पडला आहे ?
- (A) संसार
- (B) पाय
- (C) लढा
- (D) कणा

(ii) घरट्यात पाहुणी म्हणून कोण आली होती ?
- (A) मुलगी
- (B) गंगामाई
- (C) पाऊस
- (D) गुरुजी

(iii) आलेल्या परिस्थितीला तरुण कोणाला सोबत घेऊन लढतो आहे ?
- (A) आईला
- (B) कारभारणीला
- (C) आजीला
- (D) बहिणीला

(iv) कवी व कवितेतील पूरग्रस्त तरुण यांच्यात कोणते नाते असावे ?
- (A) वडील-मुलगा
- (B) नातू-आजोबा
- (C) शेजारी-शेजारी
- (D) शिक्षक-विद्यार्थी

(b) दिलेल्या कवितेच्या आधारे पुढील प्रश्नांची **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही **4**) **4 × 1 = 4**

(i) प्रसाद म्हणून पाहुणीने पूरग्रस्त तरुणाला काय दिले ?
(ii) तरुण हसत हसत केव्हा उठला ?
(iii) पूरग्रस्त तरुणाने कोणती गोष्ट स्पष्टपणे नाकारली ?
(iv) गंगामाई चार भिंतीत कोणाप्रमाणे नाचून गेली ?
(v) कवितेत कवीने कोणत्या ऋतूचे वर्णन केले आहे ?

## विभाग – 'ब' : व्याकरण (20 गुण)
## Section – 'B' : Grammar (20 Marks)

3. (a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 4) $4 \times 1 = 4$

(i) खालील पर्यायांतून सामान्य नामाचा योग्य पर्याय निवडा.

(A) समुद्र (B) राग

(C) राधिका (D) मुसळधार

(ii) पुढे दिलेली कोणती विधाने बरोबर आहेत ?

(a) क्रियापद म्हणजे वाक्याच्या शेवटीच येणारे पद.

(b) क्रियापद म्हणजे वाक्यातील कृतिदर्शक शब्द.

(c) क्रियापद म्हणजे वाक्याचा अर्थपूर्ण करणारा शब्द.

(d) क्रियापद हे वाक्यातील कर्त्यानुसार बदलते.

(A) विधान a - b बरोबर c - d चूक

(B) विधान a - b - c बरोबर d चूक

(C) विधान b - c - d बरोबर a चूक

(D) विधान c - d बरोबर a - b चूक

(iii) खालीलपैकी गटात न बसणारे वाक्य कोणते ?

(A) अबब ! केवढी उंच इमारत ही !

(B) खाल्लीस का माती तू ?

(C) अरे देवा ! चुकलं की तुझं गणित !

(D) अय्या ! कित्ती छान आहे तुझ्या साडीचा रंग !

(iv) पुढील वाक्यात रिकाम्या जागी योग्य क्रियाविशेषण अव्ययाचा वापर करा.

नदीच्या ________ एक भलेमोठे अरण्य होते.

(A) पाठीमागे (B) पलीकडे

(C) इकडे (D) खाली

(v) वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

देवाची प्रार्थना मनापासून करावी.

(A) उभयान्वयी अव्यय (B) सर्वनाम

(C) शब्दयोगी अव्यय (D) विशेषण

(b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3) **3 × 1 = 3**

(i) शिक्षण पूर्व झाल्यावर लगेचच नोकरी मिळेल. (वाक्याचा काळ ओळखा.)

(ii) हरवलेल्या माणसांच्या आठवणींनी मन सैरभैर झाले. (भविष्यकालीन वाक्य तयार करा.)

(iii) पावसाळ्यात रहदारीचा खोळंबा होईल. (वर्तमानकालीन वाक्य तयार करा.)

(iv) पोटभर जेवल्यावर महेशला बरे वाटते. (भूतकालीन वाक्य तयार करा.)

(c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3) **3 × 1 = 3**

(i) औषधे घेतल्यावर चिरागला बरे वाटले का ? (वाक्याचा प्रकार ओळखा.)

(ii) कुशलला दिलेली शिक्षा मान्य नाही. (विधानार्थी होकारार्थी वाक्य तयार करा.)

(iii) सर्वांनी सूचनांचे पालन करावे. (आज्ञार्थी वाक्य तयार करा.)

(iv) तुझे अक्षर खूप अशुद्ध आहे. (उद्गारार्थी वाक्य तयार करा.)

(d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) **2 × 1 = 2**

(i) खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द कोणता, ते ओळखा.

(A) कान (B) प्राणी

(C) खांब (D) चिंच

(ii) महामारीमुळे <u>देऊळ</u> बंद होते.

(अधोरेखित शब्दाच्या वचनामध्ये बदल करून वाक्य पुन्हा लिहा.)

(iii) 'इमारत' – या शब्दाचे वचन बदलून लिहा.

4. (a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) **2 × 1 = 2**

(i) पुढीलपैकी भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय निवडा.

(A) पत्रा (B) पाकीट

(C) छत (D) पाखरू

(ii) लिंगविचारानुसार गटात न बसणारा शब्द कोणता ?

(A) कागद (B) डोंगर

(C) गाडी (D) रस्ता

(iii) पुढीलपैकी नपुंसकलिंगी शब्दाचा पर्याय निवडा.

(A) टाकी (B) कपाट

(C) साबण (D) बांगडी

(b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) $2 \times 1 = 2$

(i) खालीलपैकी समानार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती ?

(A) शाल = सभ्य (B) उपास = आहार

(C) दास = सेवक (D) नवल = हैराण

(ii) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

(A) कामगार (B) कौशल्य

(C) कसब (D) निपुणता

(iii) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

(A) द्रव्य (B) धन

(C) संपत्ती (D) घनदाट

(c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) $2 \times 1 = 2$

(i) खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती ?

(A) दूर × लांब (B) शेवट × सांगता

(C) जमा × खर्च (D) स्तुती × प्रशंसा

(ii) 'काळोख' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द पुढील पर्यायांतून ओळखा.

(A) प्रकाश (B) प्रधान

(C) अंधार (D) तिमिर

(iii) 'दास' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द पुढील पर्यायांतून ओळखा.

(A) दासी (B) मालक

(C) सेवक (D) गुरू

(d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) $2 \times 1 = 2$

(i) खालीलपैकी समास प्रकारांच्या गटात न बसणारा शब्द कोणता ?

(A) मायलेक (B) पाच-पन्नास

(C) सप्तर्षी (D) अडचण

(ii) ज्या सामासिक पदाचे पहिले पद संख्यावाचक असून ते महत्त्वाचे असते, त्यास ________ समास असे म्हणात.

(A) समाहार द्वंद्व समास (B) वैकल्पिक द्वंद्व समास

(C) अव्ययीभाव समास (D) द्विगू समास

(iii) 'बेफिकीर' या शब्दाचा समास पुढीलपैकी कोणता ?

(A) अव्ययीभाव समास (B) इतरेतर द्वंद्व समास

(C) द्विगू समास (D) समाहार द्वंद्व समास

## विभाग – ‘क’ – पाठ्यपुस्तकावर आधारित (30 गुण)

## Section – ‘C’ – Text book based (30 Marks)

5. (a) पुढील प्रश्नांची केवळ **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही **3**) **3 × 1 = 3**

(i) अभिषेकच्या बाबांनी कोणत्या गोष्टीबद्दल त्यांची मळमळ व्यक्त केली ?

(ii) कुटुंबाच्या कोणत्या कृतीने पंतांच्या वजनक्षय संकल्पाला सुरुंग लागला ?

(iii) कवितेचं गाण्यात केव्हा रूपांतर होते ?

(iv) लेखक रा. ग. जाधव रोज संध्याकाळी फिरावयास कोठे जात असत ?

(v) निरंजन वार लावून का जेवायचा ?

(b) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही **3**)

**3 × 1 = 3**

(i) आकाश मेघरहित ________ नितळाईने नटले होते.

(काळ्या, निळ्या, हिरव्या, जांभळ्या)

(ii) डाव्या बाजूस रुळाखाली पडलेल्या भल्यामोठ्या ________ कडे त्याचं लक्ष गेले.

(दगडा, खड्ड्या, भगदाडा, छिद्रा)

(iii) त्यावेळची हायस्कूलची प्रवेश फी ________ रुपये होती.

(पंचवीस, एकतीस, एक्कावन्न, एकवीस)

(iv) पुन्हा ________ करिता वेगळं मॉर्निंग वॉकचं नाटक करतो.

(दाखवण्या, व्यायामा, चालण्या, दिसण्या)

(v) तुमच्यासारख्या ________ मित्रांमुळे माझं मनोरंजनही होईल.

(गुणी, निःस्वार्थी, चतुर, परोपकारी)

(c) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे **40** ते **50** शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही **1**) **1 × 3 = 3**

(i) ‘खरा नागरिक’ या पाठाच्या आधारे खऱ्या नागरिकाची वैशिष्ट्ये सांगा.

(ii) ‘रंग साहित्याचे’ या पाठाच्या आधारे ‘नाटक’ या साहित्यप्रकाराचा परिचय करून द्या.

(iii) गोजिरी, गुलाबी पावलं असूनही पावडे काकांच्या पावलांचे ठसे ॲपवर काळी का उमटली, स्पष्ट करा.

(d) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यांतील योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा. $5 \times 1 = 5$

(उसंत न लाभणे, बरबाद होणे, हातभार लावणे, आक्षेप नोंदवणे, गोडी लावणे)

(i) सेतूबंधनात खारूताईने श्रीरामांना मदत केली.

(ii) दिवाळीत आईला कामातून अजिबात वेळ मिळत नाही.

(iii) ब्रिटिशांनी अत्यावश्यक वस्तूंवर कर लावल्यावर भारतीय नेत्यांनी त्यावर हरकत घेतली.

(iv) हसतखेळत गणित शिकवून जोशी सरांनी मुलांमध्ये गणिताची आवड निर्माण केली.

(v) अतिवृष्टीमुळे सगळी पिके वाया गेली.

6. (a) पुढील प्रश्नांची **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 4) $4 \times 1 = 4$

(i) वणवा कोठे लागला आहे ?

(ii) कवी सुर्वे यांची कोणती गोष्ट दारिद्र्याकडे गहाण पडली आहे ?

(iii) देशवासियांच्या मुठीत कोणती गोष्ट नाही ?

(iv) फुलामुलांतून कोण हसत आहे ?

(v) संत नामदेव कोणाचे अंकित दास आहेत ?

(vi) कवी सुर्वे यांचे वाट पाहण्यात किती दिवस गेले ?

(b) खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही 4) $4 \times 1 = 4$

(i) __________ असे तुला एकच औक्षण.

(A) देशवासियांचे (B) जनतेचे

(C) देशसेवकांचे (D) दीनदुबळ्यांचे

(ii) शेतामधुनी पिकवू__________

(A) मोती (B) धान्य

(C) अन्न (D) पीक

(iii) माता धांवें __________

(A) दयाळू (B) कनवाळू

(C) मायाळू (D) कृपाळू

(iv) हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर __________

(A) उन्हाळे (B) पावसाळे

(C) हिवाळे (D) ढग काळे

(v) जीव ओवाळावा तरी जीव किती हा __________

(A) कमाल (B) महान

(C) लहान (D) सान

(c) खालीलपैकी कोणत्याही **एका** काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. (कोणतेही 1) **1 × 3 = 3**

(i) 'घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार'

(ii) 'झोतभट्टीत शेकावे पोलाद, तसे आयुष्य छान शेकले'

7\. (a) पुढील प्रश्नांची **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 3) **3 × 1 = 3**

(i) 'दिवाळी' हा शब्द कोणत्या संस्कृत शब्दावरून आला आहे ?

(ii) भारतात अणुसंशोधनाचा पाया कोणी घातला ?

(iii) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कोणता ठराव मंजूर करण्यात आला ?

(iv) डॉ. काकोडकर जेव्हा ट्रेनिंग स्कूलला गेले, तेव्हा ती संस्था सुरू होऊन किती वर्षे झाली होती ?

(b) पुढीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे **40** ते **50** शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही 1) **1 × 2 = 2**

(i) 'स्काय इज द लिमिट' अशी परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ?

(ii) 'व्युत्पत्ती' म्हणजे काय, ते सांगून व्युत्पत्ती कोशाचे स्वरूप स्पष्ट करा.

## विभाग–'ङ' : लेखन (15 गुण)

## Section – 'D' : Writing (15 Marks)

8\. (a) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **120** ते **150** शब्दांत निबंध लिहा. **1 × 6 = 6**

(i) **युद्धभूमीवर धारातीर्थी पडू लागलेल्या सैनिकाचे मनोगत –**

मुद्दे – बालपण सुखात – सैन्य दलात भरती होण्याचे स्वप्न – योग्य प्रशिक्षण – सेवेसाठी बांग्लादेश सीमेवर रुजू – शत्रूचे भारतीय हद्दीत अतिक्रमण – जोरदार युद्ध – मरणासन्न अवस्था – भारतमातेसाठी प्राणार्पण करण्याची वेळ – भारतमातेची अजून सेवा करू शकत नाही, याचा खेद – जयहिंद.

(ii) **परीक्षा रद्द झाल्या तर....**

मुद्दे – शालेय जीवनातील सुखद क्षण – मैत्री, दंगामस्ती आनंद – अभ्यासात आवड मात्र परीक्षा नको – रद्द झाल्यास तणावरहीत अभ्यास – उत्तीर्ण-अनुत्तीर्ण ताणच नाही – पण याचे दुष्परिणाम – परीक्षांचे महत्त्व – परीक्षा तर हव्यात, मग त्या कशा ?

(iii) **मी अनुभवलेला पावसाळ्यातील एक दिवस**

मुद्दे – तीव्र उन्हाळा – सर्व जण पावसाची वाट बघतात – एक दिवशी दुपारी अचानक सोसाट्याचा वारा – विजांचा कडकडाट – जोरदार पाऊस – मातीचा वास – आनंददायी वातावरण – लहान मुलांचे पावसात भिजणे – नोकरदारांची घरी परतण्यासाठी धावपळ – शेतकऱ्यांचा आनंद – पाऊस उघडताच पक्षांचा किलबिलाट – वातावरणातील चैतन्य.

(b) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणतीहा **एक** कथा लिहून समर्पक शीर्षक व अर्थपूर्ण तात्पर्य लिहा.

**1 × 5 = 5**

(i) मुद्दे – चुणचुणीत मुलगा – रेल्वे फाटकाजवळ झोपडी – अभ्यासाची आवड – रात्री दिव्याखाली अभ्यास – अचानक मोठा आवाज – धावत जाऊन पाहणे – पावसामुळे रेल्वेरूळ खचणे – प्रसंगावधान – पटकन अंगातील शर्ट काढून रेल्वेच्या दिशेने धाव – अनर्थ टळणे – रेल्वे खात्याकडून कौतुक – राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार – तात्पर्य.

**किंवा/OR**

(ii) भले मोठे जलाशय – आजूबाजूला घनदाट जंगल – जलाशयात अनेक मगरी – झाडांवरील माकडांशी मैत्री – माकडाचे काळीज खाण्याची इच्छा – गोड बोलून माकडाला फसवणे – माकड अतिहुशार – काळीज झाडालाच टांगलेले – युक्ती फळली – मगर निराश – तात्पर्य.

(c) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) **1 × 4 = 4**

(i) समीर/सानवी साने राहणार आकाश पॅरडाईज, राजवाडा मार्ग, मुंबई-10 येथून त्यांच्या विभागात अनियमित व कमी वीजपुरवठा होत असल्याची तक्रार मुंबई महानगरपालिका, वीजपुरवठा विभाग 'क' यांना पत्राद्वारे कळवत आहे.

(ii) विहान / विनीता सातपुते, आदर्श महाविद्यालय, पवनानगर, शिंदेवाडी, जि. सातारा येथून शाळेत गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आवश्यक असलेल्या सजावटीच्या साहित्याची मागणी करणारे पत्र विविधा व्हरायटीज, रविवार पेठ, सावतामाळी चौक, सातारा यांना लिहीत आहे.

---